# || महर्षि वसिष्ठ वेद विद्यालय ||

# || श्रीसंत तुकाराम महाराज वारकरी विद्यालय ||



## श्रीसंत नरहरिनाथमहाराज संस्थान

देऊळगांवराजा - ४४३२०४, जि. बुलडाणा (महाराष्ट्र)

# विद्यालयाची माहितीपुस्तिका

## मार्गदर्शन तथा शुभाशीर्वाद



## प.पू. गुरुवर्य मोहननाथ महाराज पैठणकर

# श्रीसंत नरहरिनाथमहाराज संस्थान

देऊळगाव राजा, जि. बुलढाणा, महाराष्ट्र - ४४३२०४


## || महर्षि वसिष्ठ वेद विद्यालय ||

## || श्रीसंत तुकाराम महाराज वारकरी विद्यालय ||

# विद्यालयाची माहितीपुस्तिका


प्रकाशक : संत नरहरिनाथमहाराज सेवा प्रतिष्ठान

प्रकाशन दिनांक : आषाढ शु.१२, बुधवार दि.२१ जुलै २०२१

मुद्रक : रिध्दी प्रिंट्स, मुंबई

सजावट : श्रीमंत माऊली प्रतिष्ठान, मुंबई

सुलेखन : सागर गंधारे, अहमदनगर

|| महर्षि वसिष्ठ वेद विद्यालय ||

|| श्रीसंत तुकाराम महाराज वारकरी विद्यालय ||

## विषय सूची


- विद्यालयाचे उद्दिष्ट (मनोगत)
- सर्वांगीण विकास
- अभ्यासक्रम
- दिनचर्या
- प्रकल्प
- कृष्णप्रिया गौशाळा
- सेवा-सहयोग
- प्रधानाध्यापक परिचय
- विद्यालयाची नियमावली
- प्रवेश अर्ज

# || महर्षि वसिष्ठ वेद विद्यालय ||

## मनोगत

संत नरहरिनाथमहाराज संस्थान
१७९३-२०२१

सध्याची अध्यात्मिक व सामाजिक परिस्थिती पाहता ''गुरु कुलवास'' या प्राचीन शिक्षण पध्दतीची मोठी आवश्यकता भासते आहे. वेद काळापासून ते सध्याच्या आधुनिक काळापर्यंत सामर्थ्यशाली गुरू शिष्यांची परंपरा जी अखंडित भारताच्या अध्यात्मिक व सामाजिक उत्कर्षाचा, उन्नतीचा केंद्रबिंदू ठरली आहे. त्यामध्ये महर्षि वेदव्यास, महर्षि यज्ञावल्क्य, महर्षि वाल्मिकी, आद्यगुरू मच्छिंद्रनाथ, गुरू गोरक्षनाथ, श्रीमदाद्य शंकराचार्य, श्रीसंत निवृत्तिनाथमहाराज, संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वरमहाराज, रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद आदी ऋषींची, संतांची व सत्पुरूषांची नावे तेजाळत आहेत.

या सर्वांच्या अतुलनीय कार्याने भारतीय वैदिक संस्कृतीला अध्यात्मिक बैठक, अध्यात्मिक शक्ती व अध्यात्मिक विचारधारा प्राप्त झाली, जी सर्व मनुष्यांना समृध्द, सशक्त करणारी व देव, देश अन् धर्माच्या सेवेसाठी प्रेरित करणारी आहे. याच महान परंपरेचा आदर्श समोर ठेऊन अनंत कालापासून चालत आलेल्या वैदिक संस्कृतिची जोपासना करण्यासाठी, वेदाध्यापनाचे कार्य करण्यासाठी आणि वेद व विज्ञान यांच्याद्वारे राष्ट्राला व देशाला समृध्द करणारी युवा पिढी निर्माण करण्यासाठी ''महर्षि वसिष्ठ वेद विद्यालय'' सुरू करीत आहोत.

**आपल्या मुलाच्या समृध्द व उज्ज्वल भविष्यासाठी अवश्य प्रवेश द्या.**

**प्रवेशासंदर्भात चौकशी करीता संपर्क सूत्र हे पान बघावे.**

**विद्यालयासाठी सेवा-सहकार्याकरिता ''सेवा सहयोग'' हे पान बघावे.**

संत नरहरिनाथमहाराज संस्थान
१७९३-२०२१

# ॥ श्रीसंत तुकाराम महाराज वारकरी विद्यालय ॥

## मनोगत

कैवल्यसाम्राज्यचक्रवर्ती संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वर महाराजांनी वारकरी संप्रदायाचा पाया रचला व त्याला बैठक दिली ती संतशिरोमणी नामदेव महाराज, श्रीसंत सावता महाराज, शांतिब्रह्म श्रीएकनाथ महाराज, जगद्गुरू श्रीसंत तुकाराम महाराज आदि संतांनी. तसेच अलीकडच्या काळात अनेक साधू सत्पुरुषांनी संपूर्ण महाराष्ट्रासह अनेक राज्यांत वारकरी संप्रदायाच्या प्रचार व प्रसाराचे महान कार्य केले आहे. वारकरी संप्रदायाची शुध्द परंपरा जनमानसात रुजविली आहे.

वेद हे जसे आपल्या धर्माचे मूळ आहे तसेच श्रीमद्भगवद्गीता हा आपला धर्मग्रंथ आहे आणि ज्ञानेश्वरी हा त्या गीतेवरील एक अनमोल अलंकार होय. रामायणामध्ये आचरणशील श्रेष्ठ जीवन कसे असावे हे सांगितले आहे, श्रीमद्भागवतात श्रेष्ठ भक्तीचे दर्शन घडविले आहे, परंतु ज्ञानेश्वरीमध्ये या सर्व ग्रंथांचा आशय तर आहेच पण सखोल विज्ञान व गूढ अद्वैत तत्त्वज्ञान अगदी सोप्या शब्दांत ज्ञानेश्वर महाराजांनी सांगितले आहे. गीतेतील प्रत्येक श्लोक, ज्ञानेश्वरीतील प्रत्येक ओवी, श्रीतुकोबारायांसह सकल संतांच्या गाथ्यातील प्रत्येक अभंग म्हणजे एक एक मंत्रच होय.

याच संतवाङमयाचे शिक्षण घराघरांत पोहोचावे, आचारशुध्द व सेवाव्रताने वारकरी संप्रदायाची परंपरा जतन करणारी पिढी निर्माण होऊन वारकरी संप्रदायाचा अखंड भारतात प्रचार व प्रसार व्हावा व वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून समृध्द व सशक्त राष्ट्र निर्माण करणारी आचारसंपन्न व विचारशील युवापिढी तयार व्हावी. या उदात्त हेतूने **''श्रीसंत तुकाराम महाराज वारकरी विद्यालय''** सुरू करीत आहोत.

**आपल्या मुलाच्या समृध्द व उज्ज्वल भविष्यासाठी अवश्य प्रवेश द्या.**

**प्रवेशासंदर्भात चौकशी करीता संपर्क सूत्र हे पान बघावे.**

**विद्यालयासाठी सेवा-सहकार्याकरिता ''सेवा सहयोग'' हे पान बघावे.**

# सर्वांगीण विकास व माहिती तंत्रज्ञान शिक्षण

सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे. त्यामुळे शालेय व इतर शिक्षणाबरोबरच तंत्रज्ञानाचेही शिक्षण महत्त्वाचे आहे. हा विचार समोर ठेऊन महर्षि वसिष्ठ वेद विद्यालय व श्रीसंत तुकाराम महाराज वारकरी विद्यालय या दोन्ही विद्यालयातील विद्यार्थ्यांना कॉम्प्युटरचे शिक्षण दिले जाणार आहे. जेणेकरून वैदिक व वारकरी परंपरेच्या प्रचार व प्रसाराचे कार्य जगभरात पोहोचण्याला मदत होईल.

त्याचबरोबर जागतिक भाषा समजली जाणाऱ्या इंग्रजी भाषेचे देखील शिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाणार आहे. जेणेकरून त्या भाषेतही वैदिक व वारकरी परंपरेचा किमान परिचय विद्यार्थी देऊ शकतील. यासह गणित, इतिहास, सामान्यज्ञान, संस्कृत, कला व Personality Development इत्यादी विषयांचे देखील शिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. जेणेकरून वेद विद्यालयातून बाहेर पडल्यावर ते आपले शिक्षण घेऊ शकतील. (किंबहुना पुढील शिक्षण घेण्याकरीता विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण येणार नाही.)

शालेय व तंत्रज्ञानाच्या शिक्षणाबरोबरच योग शिबीर, बौध्दिक व शारीरिक विकासासाठी विविध स्पर्धा व संस्कार वर्गांचे देखील आयोजन करण्यात येणार आहे.

वैदिक व वारकरी शिक्षणाबरोबरच प्रत्येक विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास व्हावा याकरीता विद्यालय कटीबध्द असेल.

**वरील सर्व विषयांकरीता स्वतंत्र अध्यापक असणार आहेत.**

# ॥ महर्षि वसिष्ठ वेद विद्यालय ॥

## अभ्यासक्रम

### प्रथम वर्ष अभ्यासक्रम

- **संध्योपासना**
- **प्रातःस्मरण** (पौराणिक व वैदिक)
- **वैश्वदेव, भोजन प्रयोग, यज्ञोपवीत धारण प्रयोग, नित्योपासना :**
  १) राम रक्षा, २) मारुती स्तोत्र, ३) हनुमान चालीसा
- **वैदिक सूक्तपाठ :** १) शांतिपाठ, २) पुरुषसूक्त, ३) आब्रह्मन, ४) शिवसंकल्प सूक्त
- **शुक्ल यजुर्वेद संहिता :** अध्याय १ ते ७ पर्यंत (एकूण मंत्रसंख्या : २९३)

### द्वितीय वर्ष अभ्यासक्रम

- **सूक्तपाठ :** १) शिवमहिम्न स्तोत्र, २) श्रीसूक्त, ३) गणपत्यथर्वशीर्ष,
  ४) रात्री सूक्त, ५) विष्णु सहस्त्रनाम
- **वैदिक सूक्तपाठ :** १) रूद्र सूक्त, २) शांत्याध्याय
- **शुक्ल यजुर्वेद संहिता :** अध्याय ८ ते १६ पर्यंत (एकूण मंत्रसंख्या : ५५७)

### तृतीय वर्ष अभ्यासक्रम

- **पारस्कार गृह्य सूत्र**
- **शुक्ल यजुर्वेद संहिता :** अध्याय १७ ते २५ पर्यंत (एकूण मंत्रसंख्या : ६०८)

### चतुर्थ वर्ष अभ्यासक्रम

- **शुक्ल यजुर्वेद संहिता :** अध्याय २६ ते ४० पर्यंत (एकूण मंत्रसंख्या : ५१७)
- **पदपाठ संथा :** अध्याय १ ते ३

# पौरोहित्य अभ्यासक्रम

## पंचम वर्ष अभ्यासक्रम

- ग्रह शांती प्रयोग
- वास्तुशांती प्रयोग : इतर हवनादी कर्म व अनुष्ठान
- प्रतिष्ठा प्रयोग

## षष्ठम वर्ष अभ्यासक्रम

- षोडशसंस्कार प्रयोग
- महालया प्रयोग
- अंत्येष्टी व इतर प्रयोग

# ॥ श्रीसंत तुकाराम महाराज वारकरी विद्यालय ॥

## अभ्यासक्रम

## प्रथम वर्ष अभ्यासक्रम

- **वारकरी संप्रदाय महिमा / माहिती व संत चरित्र परिचय**
- **नियमाचे अभंग पाठांतर :** १) हरिपाठ, २) मंगलाचरण, ३) संपूर्ण काकडा भजन, ४) वाराचे अभंग, ५) एकादशीचे अभंग, ६) द्वादशीचे अभंग, ७) क्षीरापतीचे अभंग, ८) पूजेच्या वेळी म्हणावयाचे अभंग, ९) विनवणीचे अभंग, १०) आरती संग्रह, ११) उपसंहार व प्रसाद (एकूण अभंग संख्या : ३५१)
- **चिरंजीवपद पाठांतर**
- **ज्ञानेश्वरी पाठांतर :** अध्याय १ नमन, अ. २ : प्रजहाती यदा कामान्, अ. ३ : काम एष क्रोध एष, अ. ४ : यदा यदा ही धर्मस्य, अ. ५ : येहिसंस्पर्शजा योगा, अ. ६ : असंशयं महाबाहो, अ. ७ : दैवी ह्येषागुण मयी, या श्लोकांवरील ओव्या
- **मराठी व संस्कृत व्याकरण** (एकूण ओवी संख्या : ६४९)
- **विष्णु सहस्रनाम संथा**

## द्वितीय वर्ष अभ्यासक्रम

- **प्रासंगिक / नैमित्तिक अभंग पाठांतर :** १) गौळणी, २) नाटाचे अभंग, ३) श्रीराम जन्म, ४) श्रीहनुमान जन्म, ५) श्रीकृष्ण जन्म, ६) श्री नृसिंह जयंती, ७) श्री वामन जयंती, ८) श्रीदत्त जन्म, ९) काल्याचे अभंग, १०) कथाकाळीची मर्यादा, ११) कीर्तन महिमा, १२) भगवद्गीता माहात्म्य, १३) श्रीज्ञानेश्वरी माहात्म्य, १४) श्रीनिवृत्तिनाथमहाराज, त्र्यंबकेश्वर, गोदावरी माहात्म्य, १५) पंढरी माहात्म्य (एकूण अभंग संख्या : २९८)
- **ज्ञानेश्वरी पाठांतर :** अध्याय ८ : मामुपेत्य पुनर्जन्म, अध्याय ९ : मोघाशा मोघकर्मानो, अध्याय १० : नमन व मृत्युःसर्व हरश्चाह, अध्याय ११: सखेतीमत्वा प्रसभं यदुक्तं, अध्याय १२ : नमन व अद्वेष्टा सर्वभूतानां, या श्लोकांवरील ओव्या (एकूण ओवी संख्या : ७८२)
- **श्रीमद्भगवद्गीता संथा व अन्वयार्थासह**
- **विचारसागर**

# ॥ श्रीसंत तुकाराम महाराज वारकरी विद्यालय ॥

## अभ्यासक्रम

संत नरहरिनाथमहाराज संस्थान
नाथसंप्रदायाच्या उज्वल परंपरेची २२८ वर्षे
१७९३-२०२१

## तृतीय वर्ष अभ्यासक्रम

- **समाधी सोहळा प्रकरण पाठांतर :** १) श्रीज्ञानेश्वर महाराज समाधी सोहळा, २) श्रीसोपानदेव महाराज समाधी सोहळा, ३) श्रीसंत मुक्ताबाई निर्याण (अंतर्धान सोहळा) ४) श्रीनिवृत्तिनाथ महाराज समाधी सोहळा, ५) श्रीएकनाथ महाराज जलसमाधी सोहळा, ६) श्रीनामदेव महाराजांची आदि, ७) श्रीनामदेव महाराज समाधी सोहळा, ८) श्रीसावतामहाराज निर्याण, ९) श्रीचोखोबाराय महाराज निर्याण, १०) श्रीसेना महाराज निर्याण, ११) श्रीनरहरीसोनार महाराज निर्याण, १२) श्रीतुकाराम महाराज निर्याण (वैकुंठगमन सोहळा), १३) निवडक अभंग (एकूण अभंग संख्या : २९१)
- **ज्ञानेश्वरी पाठांतर :** अ-१३: नमन व अमानित्वमदंभित्वं, अ-१४: नमन व कर्मणः सुकृतस्याहु, अ-१५: नमन व निर्माणमोहा जितसंग दोषा, अ-१६: नमन, दैवासुरसंपत्ति वर्णन व तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते, या श्लोकांवरील ओव्या (एकूण ओवी संख्या : ८३३)
- **श्रीज्ञानेश्वरी चिंतन**
- **ग्रंथ परिचय :** १) श्रीतुकोबाराय गाथा, २) श्रीनामदेवमहाराज गाथा, ३) अमृतानुभव, ४) चांगदेव पासष्टी, ५) सोपानदेवी, ६) भावार्थ रामायण, ७) श्रीएकनाथी भागवत

## चतुर्थ वर्ष अभ्यासक्रम

- **अभंग पाठांतर :** १) ताटीचे अभंग, २) पंढरीत प्रवेश करतानाचे अभंग, ३) पंढरीत प्रवेश केल्यानंतरचे अभंग, ४) श्रीपांडुरंग-पुंडलिक संवाद, ५) नक्र उध्दार, ६) भारुड, ७) रूपकात्मक अभंग, ८) करुणापर अभंग, ९) मदालसा, १०) शिवाजी महाराज तुकाराम महाराज भेट प्रसंग अभंग, ११) विरहिणी, १२) शिवरात्री माहात्म्य व कथा, १३) अन्त्ययात्रेच्या वेळी म्हणावयाचे अभंग (एकूण अभंग संख्या : २४९)
- **ज्ञानेश्वरी पाठांतर :** अ-१७: नमन, सत्व, रज, तमादि आहार, शरीर, वाङमय, मनादि तप व ओम तत्सदीतीनिर्देशो, अ-१८: नमन, इदं ते ना तपस्काय, य इमं परमं गुह्यं, न च तस्मान्मनुष्येषु, अध्येष्यते च य इमं, श्रध्दावाननसुयश्च, व यत्र योगेश्वरःकृष्णो, या श्लोकांवरील ओव्या.
- **श्री ज्ञानेश्वरी चिंतन** (एकूण ओवी संख्या : ५२१)
- **कीर्तन प्रात्यक्षिक प्रशिक्षण व परीक्षा**

# ॥ महर्षि वसिष्ठ वेद विद्यालय ॥

## दिनचर्या

| | |
|---|---|
| पहाटे ५.१५ वा. | प्रातःस्मरण |
| ५.४५ ते ६.३० | स्नानादी कर्म |
| ६.३० ते ७.३० | प्रातःसंध्या व सूर्यनमस्कार |
| ७.३० ते ८.०० | नित्य सेवा |
| ८.०० ते ८.४५ | अल्पाहार |
| ९.०० ते १२.०० | अध्ययन प्रथम सत्र |
| १२.०० ते १.०० | महाआरती व भोजन |
| १.०० ते १.४५ | विश्रांती |
| २.०० ते ५.०० | अध्ययन द्वितीय सत्र |
| ५.१० ते ६.३० | खेळ, विश्रांती |
| ६.३० ते ७.०० | सायंसंध्या |
| ७.०० ते ८.०० | नित्य उपासना |
| ८.०० ते ९.०० | भोजन |
| ९.०० ते ९.४५ | वाचन व शुध्द लेखन |
| रात्रौ ९.४५ ते ५.१५ | विश्रांती |



# ॥ श्रीसंत तुकाराम महाराज वारकरी विद्यालय ॥

## दिनचर्या

| | |
|---|---|
| पहाटे ५.४५ ते ६.३० | काकडा भजन / प्रातःस्मरण |
| ६.३० ते ७.१५ | स्नानादी कर्म |
| ७.१५ ते ८.०० | प्रार्थना व सूर्यनमस्कार |
| ८.०० ते ८.३० | नित्य सेवा |
| ८.३० ते ९.०० | अल्पाहार |
| ९.०० ते १२.०० | अध्ययन प्रथम सत्र |
| १२.०० ते १.०० | महाआरती व भोजन |
| १.०० ते १.४५ | विश्रांती |
| २.०० ते ५.०० | अध्ययन द्वितीय सत्र |
| ५.०० ते ६.०० | खेळ, विश्रांती |
| ६.०० ते ७.०० | हरिपाठ व भजन |
| ७.०० ते ८.०० | नित्य उपासना |
| ८.०० ते ९.०० | भोजन |
| ९.०० ते ९.४५ | वाचन व शुध्द लेखन |
| रात्रौ ९.४५ ते ५.१५ | विश्रांती |

नाथसंप्रदायाच्या उज्वल परंपरेची २२७ वर्षे
संत नरहरिनाथमहाराज संस्थान
१७९३-२०२१

# प्रकल्प



## कृष्णप्रिया गौशाळा

## परमहंस ध्यान मंदिर






## सिध्दान्तसार ग्रंथालय

## वेद भास्कर यज्ञ शाळा



वरील सर्व प्रकल्पांचा शुभारंभ विद्यालयाबरोबरच होणार आहे.

# कृष्णप्रिया गौशाळा

गुरुकुलामध्ये गोशाळेला व गोसेवेला अनन्य साधारण महत्त्व आहे. विद्यार्जनाच्या काळात विद्यार्थ्यांनि केलेली गोसेवा ही अधिक पुण्यप्रद असते. याकरीता वैदिक व वारकरी विद्यालयाबरोबरच कृष्णप्रिया गोशाळा सुरू करीत आहोत.

गोपालन-गोसंवर्धन व गोसंरक्षण हा या गोशाळेचा मुख्य उद्देश आहे. सद्यपरिस्थितीत पर्यावरण संरक्षण, पशु संरक्षण हे मानवाचे मुख्य कर्तव्य आहे. त्यातही गोमातेचे संगोपन विशेष महत्त्वाचे आहे, कारण गोमातेच्या गोरसातून प्राणवायू (Oxygen) अधिक मात्रात उत्पन्न होते. तसेच गोमातेच्या दुधात केरोटीन असते ज्याने दृष्टीचे आजार कमी होतात व शरीर सुदृढ तर होतेच शिवाय रोगप्रतिकारक शक्ती देखील वाढते. मागील काळात आपल्या सर्वांनाच ऑक्सीजनची कमतरता जाणवली, एक अर्थाने पर्यावरणाचे, गोमातेचे संरक्षण करणे हे मानवाचे मुख्य कर्तव्य आहे हा संदेश प्रकृतीने आपल्याला दिला आहे.

गोमूत्र, गोमयाद्वारे अनेक अध्यात्मिक व वैज्ञानिक लाभकारक उपाय होतात. भविष्यामध्ये या विषयीचे अधिक संशोधन व त्या अनुषंगाने कार्य करण्याचाही आमचा मानस आहे. आपल्या धर्मशास्त्रामध्ये गोदान हे सर्वश्रेष्ठ दान सांगितले आहे. समाजातील सर्व दतृत्ववान गोभक्तांनी, भाविकांनी या गोशाळेकरीता गोदान करून अथवा आपल्या स्वइच्छेने यथाशक्ती सेवा-सहकार्य करून या सत्कार्यात सहभागी व्हावे व गोमातेची कृपा प्राप्त करून घ्यावी. या गोशाळेच्या माध्यमातून मिळणारे दूध व इत्यादी गोरस विद्यार्थ्यांना दररोज देण्यात येणार आहे.



**खालीलप्रकारे आपण वार्षिक व मासिक गोसेवा करू शकता :**

- मासिक गोखाद्य दान सेवा (एक गोमाता) रू. ४,५००/-
- वार्षिक गोखाद्य दान सेवा (एक गोमाता) रू. ५४,०००/-
- मासिक गोखाद्य दान सेवा (संपूर्ण गोशाळेचे) रू. २१,०००/-
- मासिक व वार्षिक गोखाद्य दान (चारा, ढेप, घास इत्यादी) सेवा आपल्या स्वेच्छेने
- या व्यतिरिक्त आपण आपल्या इच्छेप्रमाणे देखील रोख व वस्तूरूप गोसेवा करू शकता.

# सेवा - सहयोग

महर्षि वसिष्ठ वेद विद्यालय व श्रीसंत तुकाराम महाराज वारकरी विद्यालय या दोन्ही विद्यालयातील विद्यार्थ्यांना कोणतीही शुल्क असणार नाही. निवास व भोजनासह संपूर्ण शिक्षण हे विनामूल्य असणार आहे. कारण समाजामध्ये असे अनेक लोक आहेत की ज्यांची परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे, परंतु त्यांची मूले ही अत्यंत बुध्दीवान, आशावादी व होतकरू आहेत. अशा सर्व सामान्य कुटुंबातील मुलाला सुध्दा शिक्षण घेण्याचा हक्क आहे तो त्याला मिळावा अर्थात वेदांचे, संत वाङमयाचे शिक्षण मिळावे, जेणेकरून त्या विद्यार्थ्यासह त्याच्या कुटुंबाचे व भविष्यामध्ये समाजाचे, राष्ट्राचे कल्याण होईल ही उदार भावना यामागे आहे. सत्य संकल्पाचा दाता नारायण या संत वचनाप्रमाणे भगवंत आपल्या सारख्या दातृत्ववान व दानशूर भाविकांच्या रुपाने हे कार्य सिध्दीस नेतील याचा आम्हाला विश्वास आहे. ज्या भाविकांना या सत्कार्यास सेवा, सहकार्य करण्याची इच्छा असेल त्यांच्याकरीता वार्षिक अन्नदान सेवा सुरु केली आहे. यामध्ये वर्षातील एक दिवसाचे अन्नदान आपल्या वतीने असेल. त्याचबरोबर कोणत्याही गोशाळेकरीता, ध्यान मंदिर निर्मितीकरीता, ग्रंथालयाकरीता देखील आपण रोख व वस्तु रुपाने देणगी देऊ  शकता. सर्व भाविकांना आमचे नम्र निवेदन आहे की, आपण आपल्या इच्छेप्रमाणे रोख व वस्तु स्वरुपातील सेवा करुन (देणगी देऊन) आपला सहयोग द्यावा. या महत्कार्यात सेवा सहयोग करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची सेवा ती कितीही अल्प असो, ती या सत्कार्याच्या सिध्दीसाठी महत्त्वाची ठरेल. रामायणामध्ये जसे खारीने आपल्या शक्तिप्रमाणे प्रभू श्रीरामचंद्रांच्या कार्यास योगदान दिले व अजरामर कीर्ती संपादन केली त्याचप्रमाणे आपणही आपल्या शक्तिप्रमाणे, इच्छेप्रमाणे या कार्यास तन, मन, धनाने योगदान द्यावे व प्रभुकृपा प्राप्त करुन घ्यावी.

**आपण खालीलप्रमाणे सेवा-सहयोग करु शकता.**

- वार्षिक एक दिवस अन्नदान - रू.२५००
- सप्ताह, पंधरादिवस व संपूर्ण महिना अल्पोपहार -
  सप्ताह : रू.२५०० - पंधरा दिवस : ४५०० - एक महिना : रू.९०००
- वार्षिक धान्य व वस्तुरूप सेवा -
  गहू, तांदुळ, डाळ, तेल, तूप, साखर इत्यादी कोणतीही वस्तु आपण आपल्या इच्छेनुसार देऊ शकता.

**आपण आपली गुप्तदान सेवा सुध्दा पाठवू शकता.**

कोणत्याही प्रकारची सेवा (देणगी) पाठविण्यासाठी खालील क्रमांकावर संपर्क करा.

**ह.भ.प. वेदविभूषण श्री.उद्बोधमहाराज पैठणकर**

मो : ९७३०३६६०२१ / ८५५१८३२८३२

या नंबरवर आपण Phone pe व Google Pay द्वारे आपली देणगी सेवा पाठवू शकता.

# प्रधानाध्यापक परिचय



**हरिभक्तीपरायण, वेदविभूषण, श्री.उद्बोधमहाराज पैठणकर**

प्रधानाचार्य : महर्षि वसिष्ठ वेद विद्यालय व
श्रीसंत तुकाराम महाराज वारकरी विद्यालय

वयाच्या सातव्या वर्षी व्रतबंध संस्कार झाल्यावर अल्पकालावधीतच १० जून २००१ साली वेद पाठशाळेत प्रवेश घेऊन, श्रीसंत ज्ञानेश्वर वेदविद्या प्रतिष्ठान, संभाजीनगर (औरंगाबाद), येथे शुक्ल यजुर्वेद संहिता पूर्ण करून महर्षि सांदिपनी राष्ट्रीय वेद विद्यालय, ऊज्जैन येथून वेदविभूषण पदवी प्राप्त. वैदिक शिक्षणानंतर श्रीहरिकीर्तनोत्तेजक सभा, नारद मंदिर, पुणे येथे नारदीय कीर्तन परंपरेचे अध्ययन केले व वै.स्वानंदसुखनिवासी सद्गुरु जोगमहाराज संस्थापित वारकरी शिक्षण संस्था, आळंदी येथे वारकरी संप्रदायाचे, संत वाङमयाचे व कीर्तनोपयोगी संगीताचे अध्ययन पूर्ण करून आज पावेतो महाराष्ट्रासह अनेक राज्यात प्रवचन, कीर्तन व व्याख्यानांच्या माध्यमातून सनातन वैदिक धर्म संस्कृतिचा, वारकरी संप्रदायाचा व नाथपरंपरेचा प्रचार, प्रसार करण्याचे व संत विचार जनमानसात रुजविण्याचे त्यांचे कार्य सुरू आहे. वैदिक, वारकरी व नारदीय, कीर्तनपरंपरा या क्षेत्रामध्ये युवाकीर्तनकार व इतर अनेक पुरस्कारही त्यांना प्राप्त झाले आहेत.

महर्षि वसिष्ठ वेद विद्यालय व श्रीसंत तुकाराम महाराज वारकरी विद्यालय हे वैदिक व वारकरी संयुक्त विद्यालय व्हावे ही प्रेरणा प.पू.गुरुवर्य मोहननाथ महाराज यांची आहे आणि तिला मूर्त स्वरूपात साकार करण्याची संकल्पना श्री.उद्बोधमहाराज यांची आहे. स्वतः वैदिक व वारकरी यांचे गुरुकुल पध्दतीने, शास्त्रोक्त पध्दतीने अध्ययन केलेले असल्यामुळे त्यांच्या ठायी या दोहींचा उत्तम समन्वय आपल्याला दिसून येतो.

# नियमावली

१. विद्यालयात प्रवेशाकरिता वयोमर्यादा १० ते १६ ही राहील.

२. दोन्हीही विद्यालयातील विद्यार्थ्यांना संपूर्ण शिक्षण विनामूल्य असणार आहे. याकरिता कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. मात्र सुरक्षाठेव रक्कम (deposit) स्वरूपात रुपये पंचवीस हजार जमा करावे लागतील व विद्यार्थ्यांचे संपूर्ण शिक्षण झाल्यावर, विद्यालय सोडतेवेळी ते परत केले जातील.

३. संपूर्ण अभ्यासक्रमाचे ग्रंथ, पुस्तके, हे स्वतःचे स्वतंत्र घ्यावे लागतील.
(ज्यांना शक्य नसेल त्यांना विद्यालयात सर्व पाठ्यक्रमाचे ग्रंथ, पुस्तके उपलब्ध करून दिले जातील. ज्या त्या वर्षाचे अथवा संपूर्ण वर्षाचे पुस्तकांचे शुल्क भरून आपल्याला ते मिळतील.)

४. पालकांनी वार्षिक बैठकीला उपस्थित असणे बंधनकारक राहील.

५. विद्यालयाच्या नियमांचे उल्लंघन केल्यास व विद्यार्थ्याची वेळोवेळी गैरवर्तवणूक आढळून आल्यास त्या विद्यार्थ्याचे निलंबन करण्याचे सर्व अधिकार प्रधानाचार्य यांना राहतील.

६.संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण झाल्याशिवाय (अर्धवट शिक्षण सोडून गेल्यास) सुरक्षाठेव रक्कम (deposit) परत मिळणार नाही.

७. विद्यार्थ्याबरोबर नित्योपयोगी, मूलभूत वस्तु उदाः धोतर, शर्ट, टोपी, सतरंजी, पांघरूण, गंध, तेल इत्यादी स्वतःच्या असाव्यात.

८. विद्यालयाचे नियमित सुट्ट्यांव्यतिरिक्त जास्त सुट्ट्या मिळणार नाही. (अपरिहार्य व आपत्कालीन बाब वगळता.)

# ॥ महर्षि वसिष्ठ वेद विद्यालय ॥

देऊळगाव राजा, जि. बुलढाणा, महाराष्ट्र - ४४३२०४

नाथसंप्रदायाच्या उज्वल परंपरेची २२८ वर्षे
संत नरहरिनाथमहाराज संस्थान
१७९३-२०२१

## प्रवेश अर्ज

| | | | |
|---|---|---|---|
| विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव : | | | फोटो |
| संपूर्ण पत्ता : | | | |
| गांव : | तालुका : | जिल्हा : | राज्य : |
| शिक्षण : | | माध्यम : | |
| वय : | | जन्मतारीख : | |
| यापूर्वी आध्यात्मिक शिक्षण झाले आहे का?<br>असल्यास माहिती : | | | |
| ओळखपत्र : | | आधार क्रमांक : | |
| शैक्षणिक वर्ष : / / ते / / | | प्रवेशाची तारीख : / / | |

## कौटुंबिक माहिती

| | | |
|---|---|---|
| वडिलांचे नाव : | | मोबाईल क्र.: |
| आईचे नाव : | | मोबाईल क्र.: |
| व्यवसाय : | | |
| भाऊ / बहिण : | | |
| वडिलांचे ओळखपत्र : | | आधार क्रमांक : |

विद्यालयाचे सर्व नियम आम्हाला मान्य आहेत. कोणत्याही प्रकारच्या नियमांचे उल्लंघन आमचे कडून अथवा विद्यार्थ्यांकडून होणार नाही.

विद्यार्थ्याची स्वाक्षरी

पालकांची/ वडिलांची स्वाक्षरी

टीप : अर्ज भरून प्रविष्ट करण्यापूर्वी पालकांनी व विद्यार्थ्यांनी विद्यालयाचे नियम वाचून व समजून घ्यावे.

# ॥ श्रीसंत तुकाराम महाराज वारकरी विद्यालय ॥

देऊळगाव राजा, जि. बुलढाणा, महाराष्ट्र - ४४३२०४

नाथसंप्रदायाच्या उज्वल परंपरेची २२८ वर्षे
संत नरहरिनाथमहाराज संस्थान
१७९३-२०२१

## प्रवेश अर्ज

| | | | |
|---|---|---|---|
| विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव : | | | फोटो |
| संपूर्ण पत्ता : | | | |
| गांव : | तालुका : | जिल्हा : | राज्य : |
| शिक्षण : | | माध्यम : | |
| वय : | | जन्मतारीख : | |
| यापूर्वी आध्यात्मिक शिक्षण झाले आहे का? असल्यास माहिती : | | | |
| ओळखपत्र : | | आधार क्रमांक : | |
| शैक्षणिक वर्ष : / / ते / / | | प्रवेशाची तारीख : / / | |

## कौटुंबिक माहिती

| | | |
|---|---|---|
| वडिलांचे नाव : | | मोबाईल क्र.: |
| आईचे नाव : | | मोबाईल क्र.: |
| व्यवसाय : | | |
| भाऊ / बहिण : | | |
| वडिलांचे ओळखपत्र : | आधार क्रमांक : | |

विद्यालयाचे सर्व नियम आम्हाला मान्य आहेत. कोणत्याही प्रकारच्या नियमांचे उल्लंघन आमचे कडून अथवा विद्यार्थ्यांकडून होणार नाही.

विद्यार्थ्याची स्वाक्षरी

पालकांची/ वडिलांची स्वाक्षरी

टीप : अर्ज भरून प्रविष्ट करण्यापूर्वी पालकांनी व विद्यार्थ्यांनी विद्यालयाचे नियम वाचून व समजून घ्यावे.



## संपर्क सूत्र

प्रवेश प्रक्रिया, देणगी सेवा व इतर माहिती करिता संपर्क –


**ह.भ.प. वेदविभूषण श्री.उद्बोधमहाराज पैठणकर**

मो ९७३०३६६०२१ / ८५५१८३२८३२

ई–मेल : sampark@nathpeeth.com वेबसाईट : www.nathpeeth.com

फेसबुक पेज : www.facebook.com/nathpeeth


पत्र व्यवहाराकरिता संपूर्ण पत्ता –


**श्रीसंत नरहरिनाथ महाराज संस्थान,**

देऊळगाव राजा, जि.बुलढाणा, महाराष्ट्र : ४४३२०४



# श्रीसंत नरहरिनाथमहाराज संस्थान

**आदिनाथ समारंभां ज्ञानदेव सुमध्यमाम् । अस्मद् आचार्य पर्यंताम वंदे गुरुपरंपराम् ।**

भगवान श्री आदीनाथांपासून प्रवाहीत झालेली ही नाथ परंपरा अनुक्रमे मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, श्रीसंत निवृत्तीनाथ महाराज व संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वर महाराज यांच्यापर्यंत प्रवाहीत झाली. अखंड भारतात या नाथपरंपरेचे कार्य व विस्तार झाला. संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वर महाराजांनी वारकरी संप्रदायाची संस्थापना केली व सामान्य भाविकांना परमात्म प्राप्तीचा एक राजमार्ग निर्माण करून दिला. या बरोबरच पूर्वापार चालत आलेली आपली नाथपरंपरा खंडित न होऊ देता पूर्वापर गुरूपरंपरेने लाभलेल्या अद्वयानंद वैभवाला भक्ती व प्रेम मुद्रेची जोड दिली व ही नाथपरंपरा पुढे श्री सत्यामलनाथांच्या रूपाने प्रवाहीत केली.

ज्ञानराज बोध केला सत्यामला रेडा बोलविला प्रतिष्ठाणी । असे श्रीएकनाथ महाराजांचे वचन आहे. पुढे सत्यामलनाथ, गैबीनाथ, गुप्तनाथ, उदबोधनाथ, केसरीनाथ, शिवदीननाथ व श्रीसंत श्रीनरहरिनाथमहाराज यांच्यापर्यंत ही परंपरा चालत आली. श्रीसंत श्रीनरहरिनाथमहाराज हे श्रीसंत शिवदीननाथ महाराज यांचे शिष्य, चिरंजीव. राजमाता श्रीजिजाबाई यांचे बंधूपैकी श्रीजगदेवराव राजे जाधव यांनी श्रीनरहरिनाथमहाराजांचा अनुग्रह घेऊन श्रीबालाजी महाराज मूर्ति मिळाल्यावर राजगुरू म्हणून यांना श्रीक्षेत्र देऊळगांव राजास बोलावले. श्रीसंत नरहरिनाथमहाराजांनी आपल्या संत लक्ष्मीनाथ, संत महिपतीनाथ व संत नारायणनाथ महाराज या शिष्यांसह महाराष्ट्रासह अनेक राज्यात नाथपरंपरेच्या प्रचार व प्रसाराचे मोठे कार्य केले व श्रीक्षेत्र देऊळगाव राजा येथे शके १७१५ साली समाधी घेतली. गेल्या सव्वादोनशेहून अधिक वर्षे या नाथपरंपरेचे प्रबोधनाचे व सेवेचे कार्य श्रीविठ्ठलनाथ, गणेश नाथ, गौतमनाथ, श्रीभानुदासनाथमहाराजांच्या रूपाने अखंड व अविरत सुरू राहिले व आज परमपूज्य श्री गुरुवर्य मोहननाथ महाराजांच्या शुभाशीर्वादाने, पावन सहवासाने या परंपरेच्या सेवा-विस्तार कार्याची मोठी नांदी होत आहे.

दोन वर्षापूर्वी सन २०१९ मध्ये प.पू.श्री महाराजांच्या मार्गदर्शनाने व शुभाशीर्वादाने श्रीसंत श्रीनरहरिनाथमहाराज यांच्या २२५ व्या पुण्यतिथी महोत्सवाच्या निमित्ताने अत्यंत भव्यदिव्य असा नामसंकीर्तन महोत्सव संपन्न झाला. ज्यात श्रीमहाराजांनी लिहीलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज प्रणित नाथपरंपरा या ग्रंथाच्या द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन तत्कालीन मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते संपन्न झाले त्याचबरोबर रक्तदान, वृक्षारोपण, वृक्षदान असे अनेक सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम व हजारो भाविकांचे अन्नदान संपन्न झाले.

वैदिक व वारकरी या संयुक्त विद्यालयाच्या रूपाने अध्यात्मिक क्षेत्रात एक अभिनव कार्य संस्थानच्या वतीने व परमपूज्य श्री.मोहननाथ महाराजांच्या आशीर्वादाने होत आहे.